महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत
तयार केलेल्या ई-मस्टरची Data Entry विहित
कालावधीत नरेगा संकेतस्थळावर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग (रोहयो)
शासन परिपत्रक क्र. मग्रारो २०१७/प्र.क्र. ६६ /रोहयो-६ब
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक:- ०४ सप्टेंबर,२०१७

**वाचा:** १. केंद्र शासनाचे पत्र क्र.M-११०११/०१/२०१५-RE-I (३४७२०१), दि.९ सप्टेंबर,२०१६
२. केंद्र शासनाचे पत्र क्र.J-११०६०/०१/२००७-RE-VI (३५५१५०), दि. १७ ऑगस्ट, २०१७

## शासन परिपत्रक

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही ग्रामीण भागात अकुशल रोजगार उपलब्ध करुन देणारी महत्त्वाची योजना आहे. या योजनेंतर्गत मजूरांना वेळेत मजूरी प्रदान होणे हा मजूरांचा हक्क आहे. महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ (दि. ६ ऑगस्ट, २०१४ पर्यंत सुधारित) मधील कलम ३(४) मधील तरतुदीनुसार मजूराची मजुरी १५ दिवसांच्या आत देणे बंधनकारक आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मजूरांना विहित कालावधीत मजुरी अदा करणे हा विषय केंद्र शासनाच्या प्राधान्य क्रमांकामध्ये प्रथम क्रमांकावर आहे. याबाबत केंद्र शासनाने वेळोवेळी सूचना निर्गमित केल्या आहेत. केंद्र शासनाने हजेरीपत्रक बंद झाल्यावर क्षेत्रियस्तरावर करावयाच्या कार्यवाहीचा कालावधी ८ दिवसांचा केला आहे. (यामध्ये मस्टरवर मजूरांची उपस्थिती नोंदवणे, कामाचे मोजमाप करणे, मोजमापनुसार मजुरी दर नोंदविणे, Wage list तयार करणे व FTO वर प्रथम व द्वितिय स्वाक्षरी होणे इ. बाबींचा समावेश आहे)

नरेगा संकेतस्थळावरील रिपोर्ट क्र. R.१४.२ नुसार संपूर्ण राज्यामध्ये १५ दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठीचे १५९९ मस्टर अद्याप प्रदानाकरिता प्रलंबित असल्याचे दिसून येते. तसेच, काही जिल्हयांत ९० दिवसांपेक्षा अधिक कालावधीनंतर मजुरी प्रदानाकरिता FTO वर स्वाक्षरी करण्यात आल्याचे दिसून येते. सदरहु मजुरी अदा करण्यास होणाऱ्या विलंबास नियंत्रित करण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ नंतर तयार करण्यात येणारे सर्व मस्टर्स ते बंद झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत MIS वर नोंदविणे बंधनकारक केले आहे. तसेच, पुढील काही दिवसांत हा कालावधी आणखी कमी करण्यात येईल अशा केंद्र शासनाच्या सूचना आहेत.

केंद्र शासनाच्या उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे अनुपालन करण्यात यावे. सर्व जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपल्या स्तरावरुन या बाबींचे संनियंत्रण करुन

दि. १५ सप्टेंबर,२०१७ नंतर कुठल्याही परिस्थितीमध्ये सर्व मस्टर्स बंद झाल्यापासून ३० दिवसांच्या आत त्यांची Data Entry होईल याबाबत दक्षता घ्यावी. तसेच, या प्रक्रियेस विलंब झाल्यास सर्व संबंधित कर्मचारी/अधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन आवश्यक कारवाई करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(एकनाथ डवले)
सचिव (रोहयो)

प्रत:

१. मा. मंत्री (रोहयो) यांचे स्वीय सहायक
२. सचिव (रोहयो) यांचे स्वीय सहायक
३.सर्व विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय,
४. आयुक्त (मग्रांराग्रारोहयो), आयुक्त कार्यालय, नागपूर
५. सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक, मगांराग्रारोहयो, (मुंबई शहर व उपनगर वगळून)
६. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक, मगांराग्रारोहयो, जि.प.
७.उप सचिव (रोहयो), यांचे स्विय सहाय्यक.
८. उप आयुक्त (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यलय (सर्व)
९. उप जिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व)
१०.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद (सर्व)
११.सर्व अवर सचिव, कक्ष अधिकारी, संशोधन अधिकारी, सहायक संचालक (लेखा), रोहयो प्रभाग, मंत्रालय, मुंबई.
१२.निवडनस्ती मग्रारो-६ब, मंत्रालय, मुंबई.